# थेट सामना

● संपादक : नामदेव उत्तम शिंदे    www.tsamana.com

● लातूर ● साप्ताहिक ● शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ ● वर्ष १ ले ● अंक ४८ ● E-mail :- namdevshinde680@gmail.com ● RNI. No. MHMAR/25/A2752 ● पाने ४ ● किंमत १ रुपये ●


## शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे : मुख्यमंत्री

**लातूर :** शासनाने दुष्काळाची परिस्थिती अतिशय गांभीर्याने घेतली आहे. शासन दुष्काळाची पहिली अधिसूचना लवकरच प्रसिद्ध करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

लातूर, धाराशीव जिल्ह्यातील पीक-पाणी परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आज (ता.२३) सकाळी लातूर विमानतळावर आगमन झाले, यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. दुष्काळाच्या संबंधाने करावयाच्या आवश्यक त्या उपयोजनांबाबत शासनस्तरावर योग्य कार्यवाही सुरू आहे. तसेच दुष्काळासंदर्भातील अहवाल शासनास प्राप्त झालेले आहेत. सध्याची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत शासन करत आहे. सोबतच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभही देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. दुष्काळी परिस्थितीत आवश्यक असणारे पाणी, जनावरांचा चारा आदी बाबींचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

# एकाच चेहऱ्याला कंटाळलेले पदवीधर चव्हाणांना घरचा रस्ता दाखविणार?



## पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर; मराठवाड्याचा आमदार यंदा बदला; सतीश चव्हाण यांनी असे पण काही दिवे लावले नाही!

**नामदेव शिंदे**

**लातूर :** लातूर औरंगाबाद पदवीधर विधानपरिषद निवडणुकीची आजच प्रोग्राम घोषित झाला आहे. यामुळे राजकीय पक्षांची तयारी सुरू झाली आहे. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार म्हणून मागील तीन पासून राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश चव्हाण विजयी होत आहेत. मात्र या तीन टर्ममध्ये त्यांनी पदवीधरांसाठी काय काम केले, कोणते दिवे लावले असा प्रश्न उपस्थित करीत आ. सतीश चव्हाण यांना विरोध सुरू झाला आहे. यामुळे आता पदवीधर त्यांना घरचा रस्ता दाखविणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच सुनेत्रा पवार यांनी सतीश चव्हाण यांना परत उमेदवारी न देता नव्या चेहऱ्याला संधी द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे. पण महाविकास आघाडी चव्हाण यांना आव्हान देण्यासाठी कोणता उमेदवार रिंगणात उतरविणार याकडे लक्ष लागले आहे.

### असा आहे कार्यक्रम

पदवीधर आणि शिक्षक विधान परिषदेच्या या निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया २९ सप्टेंबर पासून सुरू होणार आहे. तर २३ ऑक्टोबर रोजी मतदान होईल. तर २७ ऑक्टोबर रोजी निकाल लागून पदवीधर आणि शिक्षकांचा कौल कोणाच्या बाजूने स्पष्ट होईल.

विधानसभा निवडणुकीच्या नंतर जिल्हापरिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य मतदारसंघ विधान परिषद निवडणुकीनंतर आता राज्यातील ५ विधानपरिषद निवडणुकीच्या या रिंगणात अमरावती, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या प्रमुख विभागांचा समावेश आहे.

एकीकडे दुष्काळ, पाणी टंचाईचे सावट असताना दुसरीकडे निवडणुका लागल्यात. त्यामुळे आरोप प्रत्यारोपालाही धार येणार आहे. मराठवाडा पदवीधरचे मतदारसंघाचा विचार केला तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. सतीश चव्हाण यांनी सलग तीनवेळा विजयी होत वर्चस्व राखले आहे. मात्र आता बरेच राजकीय समीकरणे बदलली आहेत. याचा आ. सतीश चव्हाण यांना फटका बसणार का? अशी चर्चा सुरू आहे.

### या पाच आमदारांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात

■ महाराष्ट्रात मुदत संपणाऱ्या पाचही आमदारांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात आला आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधरचे सतीश चव्हाण, पुण्याचे अरुण लाड आणि नागपूरचे अभिजीत वंजारी या ३ पदवीधर प्रतिनिधींचा समावेश आहे. तर अमरावतीचे किरण सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत आसगावकर या २ शिक्षक प्रतिनिधींचाही कार्यकाळ संपत आहे. या ५ जागा रिक्त होत असल्याने सर्वच पक्षांत उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी रस्सीखेच पाहायला मिळणार आहे.

तसेच यावेळी दुष्काळी परिस्थिती असताना यातच निवडणुकीची घोषणा झाल्याने लोकांमध्ये सरकारच्या विरोधात काहीसा रोष आहे. याचाही मतदानावर परिणाम होऊन आ. सतीश चव्हाण यांना फटका बसणार का अशी ही चर्चा आहे.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेसकडून आ. सतीश चव्हाण तीन टर्म पदवीधरांच्या नेतृत्व करण्याची संधी मिळाली पण त्यांनी पदवीधरांसाठी काय काम केले असा प्रश्न उपस्थित केला जात आहे, तसेच पदवीधर मतदान करतात पण त्यांना याचा कोणताही फायदा मिळत नाही. तर सतीश चव्हाण हे के वळ निवडणुकीच्या काळात पदवीधरांना भेटतात अन् विजयी झाले की, गायब होतात. यामुळे त्यांच्या बाबतीत मोठा रोष व्यक्त केला जात आहे. चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात काय दिवे लावले असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शुन्य काम असल्याचे सांगत यावेळी सतीश चव्हाण यांना मतदार घरचा रस्ता दाखविणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख सुनेत्रा पवार यांनी सतीश चव्हाण यांना उमेदवारी न देता दुसरा उमेदवार द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे

# मुख्यमंत्री फडणवीस शेतकऱ्यांच्या बांधावर



- पिकांचे सरसकट नुकसान; मदतही सरसकट देणार : मुख्यमंत्री फडणवीस
- लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे पिकांची पाहणी; शेतकऱ्यांशी संवाद
- संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार पूर्ण ताकदीने उभे राहणार

**लातूर : मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत यावर्षी अतिशय कमी पाऊस पडला आहे. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. लातूर जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजेच केवळ ५० टक्के पाऊस झाला असून, येथील नदी-नाले व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पावसाअभावी पिकांचे सरसकट नुकसान झाल्याचे दिसत असून, राज्य शासनही शेतकऱ्यांना सरसकट मदत करेल. या संकटकाळात शेतकऱ्यांना एकटे न सोडता शासन पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक ती सर्व मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला लातूर येथून सुरुवात झाली. यावेळी त्यांनी लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार बसवराज पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



राज्यात यंदा दुष्काळाची भीषणता १९७२ पेक्षाही अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने गतीने पावले उचलली आहेत. लवकरच दुष्काळाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचे कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केले असून, यापुढेही त्यांना वीज बिल भरावे लागणार नाही. तसेच

### शेतकऱ्याला हुंदका अनावर; मुख्यमंत्र्यांकडून दिलासा

निलंगा तालुक्यातील जाऊ येथे मुख्यमंत्र्यांना पीक नुकसानीची माहिती देताना नूर पटेल हे शेतकरी भावूक झाले. वाळलेली पिके पाहून त्यांना हुंदका अनावर झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांचा हात हातात घेऊन, घाबरू नका, राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला. तसेच या ठिकाणी उपस्थित महिला शेतकऱ्यांशीही मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबवून शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला असून, या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**संकटकाळात सर्वतोपरी मदत करणार**

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना अन्नधान्यासह आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. जलसंधारणाची आणि रोजगार निर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. या संकटात राज्य शासन पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील.

पुढचे काही महिने अतिशय आव्हानात्मक असून या काळात धीर सोडू नका; संकटाचा सामना आपण सर्वजण एकजुटीने करूया, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. तसेच बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर सुरू करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

# विधानपरिषदेच्या पदवीधर, मतदारसंघांसाठी निवडणूक

**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक जाहीर करण्यात आली. राज्यात २३ ऑक्टोबर २०२६ ला मतदान होणार आहे. २७ ऑक्टोबरला मतमोजणी होईल. त्यानंतर निकाल



जाहीर केला जाईल. गेल्या काही दिवसांपासून निवडणूक होणार असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसली. निवडणूक आयोगाकडून संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले. याकरिता उमेदवारांना ६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज ही करावी लागणार आहेत. अर्जांची छाननी ही ७ ऑक्टोबर २०२६ रोजी होईल. अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतमोजणी आणि निकाल २७ ऑक्टोबर २०२६ रोजी आहे.

आता सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. अमरावती शिक्षक मतदार संघात भाजपकडून शिवाजी शिक्षण संस्थेचे संचालक हेमंत काळमेघ, खासदार अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे आणि शेखर भोयर यांचे नाव चर्चेततर काँग्रेसकडून ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांची सून आदिती पोहरे यांचं नाव चर्चेत आहे.

पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाचे राजकारण सध्या तापत आहे. अशातच वेळ पडल्यास भाजप म्हणून निवडणूक लढू. असे विधान करून जयकुमार गोरे यांनी पुणे मतदारसंघातील राजकारणात नव्या राजकीय समीकरणाबद्दल भाष्य केले. २०२० मध्ये निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सतीश चव्हाण यांना १,१६,६३८ मते तर भाजपाचे शिरीष बोराळकर ५८,७४३ मते यांचा ५७,८९५ मताधिक्याने पराभव झाला.

सतीश चव्हाण यांचा हा सलग तिसरा विजय होता. पण आता २०२० चा विचार केला असता राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. आता मतदार संघात एम. के. देशमुख आणि किरण पाटील यांचेही नाते चर्चेत आहे.

भाजपाने यंदा या निवडणुकीसाठी पूर्ण तयारी केली. भाजपा या निवडणुकीत तयारीने उतरत आहे. महाविकास आघाडीकडून उमेदवाराची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. याबाबत लवकरच उमेदवाराच्या नावाची घोषणा होईल.

# आंदोलनाच्या धास्तीनेच आचारसंहिता लावली

## रोहित पवारांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल; बीडमध्ये आंदोलनाची हाक

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील अत्यंत बिकट बनलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांना सोबत घेऊन विभागीय आयुक्तांची भेट घेतली. आम्ही शेतकऱ्यांशी थेट, कोणतीही बॅरिकेड्स किंवा मेटल डिटेक्टर न लावता चर्चा केली असून, संपूर्ण मराठवाड्यात शेतकऱ्यांचे ३५ हजार कोटी रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे,असा दावा त्यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

रोहित पवार यांनी विभागीय आयुक्तांना नुकसानीची सर्व आकडेवारी सुपूर्द करत तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टी नुकसान भरपाई देताना सरकारने शेतकऱ्यांना फसवले, आता तर भीषण दुष्काळ पडला आहे. त्यामुळे सरकारने प्रत्येक शेतकऱ्याला प्रतिहेक्टर ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी आणि जनावरांसाठी तत्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

**विमा कंपन्यांकडून फसवणूक**

पीक विमा कंपन्यांच्या कारभारावर बोट ठेवताना ते म्हणाले, पीक



कापणीच्या नावाखाली पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांची उघड फसवणूक करत आहेत. बीड जिल्ह्याचे ८०० कोटी रुपये तर धाराशिव जिल्ह्याचे २०२२ चे ६०० कोटी रुपयांचे पीक विम्याचे पैसे अजूनही रखडलेले आहेत. दबाव वाढल्यानंतर मुख्यमंत्री उद्यापासून पंचनामे करण्याचे सांगत आहेत, मग आधी काय करत होते? असा रोखठोक सवाल त्यांनी विचारला.

**भरणे मामांना आवाहन**

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर भाष्य करताना पवार म्हणाले, कृषी मंत्री म्हणतात आपल्याला अधिकार नाहीत, सर्व अधिकार मुख्यमंत्र्यांना आहेत. मग पाहणी कशासाठी केली? असा अपमान भरणे मामा कसा सहन करतात? त्यांनी आमच्यासोबत आले पाहिजे.

पूर्वीच्या सरकारमध्ये मंत्री आणि अधिकाऱ्यांना अधिकार असायचे, आता सर्व अधिकार मुख्यमंत्र्यांनी स्वतः कडेच केंद्रीत करून ठेवले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

### आंदोलने दडपण्याचा प्रयत्न

पदवीधर निवडणुकीच्या आचारसंहितेवर बोलताना रोहित पवार यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. दिवाळीनंतर आचारसंहिता लावायला हवी होती. २७ तारखेला होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या आंदोलनाची धास्ती सरकारने घेतली आहे. त्यामुळेच आंदोलन होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाला हाताशी धरून घाईघाईत निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. पण आम्ही निवडणूक आयोगाला ठणकावून सांगतो, दुष्काळात मदत मिळेपर्यंत आंदोलने थांबणार नाहीत, असा इशारा देत त्यांनी उद्या बीड जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्याची घोषणा केली.

## संपादकीय...

### आर्थिक चक्रव्यूहात एसटी!

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची, म्हणजेच 'एसटी'ची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत चालली आहे. सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाची 'जीवनरेषा' असलेल्या या महामंडळाचा वापर वेळोवेळी सत्ताधाऱ्यांनी राजकीय फायद्यासाठी केला. मात्र, त्याच वेळी एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकडे दुर्लक्ष केले. विविध सवलतींच्या घोषणा करताना सरकारने 'लाडक्या बहिणी'ला दीड हजार रुपयांची मदत दिली; पण लालपरीरूपी सावत्र बहिणीचे आर्थिक वस्त्रहरण सुरूच ठेवले. सरकारी धोरण, कागदी अटी आणि अनावश्यक आक्षेप यांच्या फटकाऱ्यांमुळे एसटीच्या चाकाचा टायरच नव्हे, तर लोखंडी रिमही तुटण्याच्या मार्गावर आली आहे. गेल्या अनेक वर्षांत सत्ताधारी आणि विविध सरकारांनी एसटीला आपल्या फायद्यासाठी वेठीस धरले. विकासाच्या नावाखाली खासगी वाहतुकीला प्रोत्साहन देणे, बसगाड्यांची संख्या कमी होऊ देणे, कंत्राटी बसगाड्यांचा शिरकाव, कामगार कपात आणि प्रशासकीय उदासीनता यांमुळे एसटी आधीच जेरीस आली आहे. आता त्यात वित्त विभागाचे आक्षेप, कागदपत्रांची मागणी आणि निधीला विलंब यांची भर पडली आहे. त्यामुळे राज्याच्या शासनाधीन असलेली एसटी संपुष्टात आणण्याचा एखादा डाव कुणी आखलेला आहे की काय, असा प्रश्न निर्माण होतो.

एसटी म्हणजे लाखो प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. असे असताना एसटीची तिजोरी रिकामी होत असताना कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेल्या वैधानिक रकमा, इंधनाची देणी, सुट्या भागांच्या खरेदीची बिले आणि इतर आर्थिक बांधिलकीही थकू लागली आहे. सरकारकडून मिळणाऱ्या निधीला वित्त विभागाच्या आक्षेपांची आणि कागदपत्रांच्या पूर्ततेची कात्री लागल्याने एसटी अधिकच आर्थिक चक्रव्यूहात अडकत चालली आहे, असे दिसते. परिणामी, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली पीएफ, ग्रॅच्युइटी, बँक कर्ज आदींची रक्कम संबंधित संस्थांकडे वेळेत जमा करण्याचे मोठे आव्हान महामंडळासमोर उभे राहिले आहे. ही केवळ कागदावरील आकडेवारी नाही. या आर्थिक दुष्टचक्राचा थेट परिणाम एसटीच्या चाकांवर होऊ शकतो. बस चालवण्यासाठी इंधन आणि रस्त्यावर सुरक्षित धावण्यासाठी सुटे भाग आवश्यक असतात. इंधनाची देणी आणि सुट्या भागांची बिले थकली, तर एसटी सेवा किती दिवस सुरळीत राहणार, हा मूलभूत प्रश्न आहे. आर्थिक कोंडी कायम राहिली, तर पुढील काळात सेवा विस्कळित होण्याची आणि कर्मचाऱ्यांच्या नक्त वेतनावरही संकट येण्याची भीती आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या पूर्ण मासिक वेतनासाठी दरमहा सुमारे ५४० कोटी रुपये आवश्यक आहेत. मात्र, या महिन्यात सरकारकडून ३८७ कोटी ७५ लाख रुपये इतकाच निधी मंजूर झाल्याचे चित्र आहे. म्हणजेच आवश्यक निधी आणि उपलब्ध निधी यांमध्ये मोठी तफावत आहे. परिणामी, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली देणी संबंधित संस्थांना न भरता सुमारे ३३० कोटी रुपयांच्या नक्त वेतनावर कर्मचाऱ्यांची बोळवण करण्याची वेळ महामंडळावर आली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत एसटीची चार हजार ५०० कोटी रुपयांहून अधिक वैधानिक देणी थकीत असल्याचे दिसते. त्यात पीएफ आणि ग्रॅच्युइटीची सुमारे तीन हजार कोटी रुपयांची देणी, एप्रिल २020 ते मार्च २०२४ या कालावधीतील वेतनवाढीच्या फरकाची ४८० कोटी ५३ लाख रुपयांची थकबाकी; तसेच डिझेल आणि सुट्या भागांपोटी सुमारे २०० कोटी रुपयांच्या देणींचा समावेश आहे. याशिवाय एसटीचा संचित तोटा १२ हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. ही आकडेवारी महामंडळासमोरील संकटाची तीव्रता स्पष्ट करते. वित्त विभागाने यापूर्वी देण्यात आलेल्या २०० कोटी रुपयांच्या बिनव्याजी कर्जाची परतफेड का झाली नाही, याचा अहवाल मागविला आहे. महामंडळाच्या आर्थिक व्यवहारांची माहिती मागवणे, विशेष लेखापरीक्षण अहवाल तपासणे, सवलत मूल्य प्रतिपूर्तीचा तपशील घेणे आणि डॅशबोर्डवरील नोंदी पडताळणे ही प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया असू शकते. मात्र, या प्रक्रियेच्या नावाखाली एसटीचा आवश्यक निधीच रोखला जात असेल, तर त्याची किंमत कोण मोजणार? एसटी ही केवळ नफा कमावणारी व्यावसायिक संस्था नाही. ती सामाजिक बांधिलकी स्वीकारून दुर्गम भागातील जनतेला सेवा देते. विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार आणि ग्रामीण भागातील सामान्य प्रवासी एसटीवर अवलंबून आहेत. त्यामुळे सवलतींच्या प्रतिपूर्तीचा निधी वेळेत मिळणे ही एसटीची मूलभूत गरज आहे.

आर्थिक चिखलात रुतलेल्या एसटीला बाहेर काढण्यासाठी तातडीचा निधी, स्पष्ट आर्थिक धोरण आणि सरकार-एसटी व्यवस्थापन यांच्यातील समन्वय आवश्यक आहे; अन्यथा आजचा आर्थिक चक्रव्यूह उद्याच्या वाहतूक संकटात रूपांतरित होण्यास वेळ लागणार नाही. वित्त विभागाने उगाच शंका उपस्थित करून निधी उपलब्धतेत अडथळे निर्माण करण्यापेक्षा आर्थिक मदतीचा मार्ग मोकळा केला, तर ग्रामीण जनतेची रक्तवाहिनी असलेली एसटी वाचू शकेल.

# युवा संसदेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## जयपूरच्या व्यासपीठावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**लातूर :** भारतीय युवा संसद मीडिया फाऊंडेशन व केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने जयपूर येथे आयोजित ३१ व्या राष्ट्रीय भारतीय युवा संसदेच्या राष्ट्रीय सत्रात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा दयानंद शिक्षण संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

दि. १५ ते १७ सप्टेंबर २०२६ दरम्यान सेंट्रल हॉल, इंदिरा गांधी पंचायती राज व ग्रामीण विकास संस्थान, जयपूर येथे हे राष्ट्रीय सत्र पार पडले. यामध्ये दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या कु. विद्या सूर्यवंशी, चि. आदित्य पवार, कु. मानसी शर्मा, चि. हर्ष शिंदाळकर तसेच प्रा. अक्षय पवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. यावर्षीच्या राष्ट्रीय सत्राची संकल्पना 'लैंगिक समानता : क्रिया से क्रिया तक-नारी शक्ती वंदन परिप्रेक्ष्य' अशी होती. तीन दिवसांच्या या सत्रात लैंगिक समानता, मानवी हक्क व जबाबदारी, महिला आरक्षण, नारी शक्ती वंदन अधिनियम, लोकशाही प्रशासन, आर्थिक अंदाजपत्रक, आंतरराष्ट्रीय विषय, युवक संवाद, विद्यार्थी संवाद आणि स्थानिक विकास आदी विविध विषयांवर चर्चासत्रे व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.

या राष्ट्रीय सत्राला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, हिमाचल प्रदेशचे राज्यपाल कविंदर गुप्ता, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, आसाम विधानसभेचे माजी उपसभापती डॉ. नुमल मोमिन, गुजरातच्या राज्यमंत्री रिवाबा जडेजा, नीरज के. पवन, राजश्री वर्मा, लक्ष्मण सिंह, प्रदीप पांडेय, बेगम बटूल तसेच भारतीय युवा संसद ट्रस्टचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.



उद्घाटन सत्रात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी युवकांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. न्याय, शांतता, विकास आणि मानवाधिकार हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सत्राच्या माध्यमातून विविध राज्यांतील युवा प्रतिनिधींशी संवाद साधण्याची आणि राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक व लोकशाही विषयांवर विचारमंथन करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. जयपूर येथील राष्ट्रीय युवा संसदेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून लातूरला परतलेल्या विद्यार्थ्यांचा दयानंद शिक्षण संस्थेतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी आणि शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा व संघ प्रमुख प्रा. अक्षय पवार यांचा व विद्यार्थ्यांचा सोमवारी गौरव करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. मनिषा आष्टेकर, डॉ. शशिकांत स्वामी, डॉ. वैशाली सातपुते, डॉ. विशाल वर्मा, डॉ. साईनाथ उमाटे आदींची उपस्थिती होती.

# गुंठेवारीला ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ

**लातूर :** शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत व हस्तांतरित झालेले भूखंड विकास नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यास ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत संधी देण्यात आली आहे. संबंधितांनी याची दखल घेत असे प्रस्ताव दाखल करून घेत भूखंड नियमित करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील गुंठेवारी विकास नियमाकुल करणेबाबत परिपत्रक क्र. अनबां-१०२०/४८०/ प्र.क्र/७९/२००० / भाग-२० दि.५ मे २००१ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ यांच्या कलम ३ मधील पोट कलम १ मध्ये १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० च्या व गुंठेवारी अधिनियमातील कलम ४ या प्रमाणे सर्व साधारण सभा ठराव क्र.२४ दि. ५ ऑगस्ट २०२६ नुसार गुंठेवारी नियमितीकरण्याची अर्ज स्वीकरण्याचे दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# विना हेल्मेट वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

**लातूर :** लातूर जिल्ह्यात रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी लातूर पोलीस दलाच्या वतीने दि. १ सप्टेंबर २०२६ पासून हेल्मेट व सीट बेल्ट वापराच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध लातूर पोलीस दलाकडून सातत्याने दंडात्मक कारवाई करण्यासोबतच मोठ्या प्रमाणावर जनजागृतीही केली जात आहे.

या मोहिमेअंतर्गत दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी एकाच दिवसात हेल्मेट न वापरणाऱ्या तब्बल १,०२१ दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तर दि. १ सप्टेंबर २०२६ पासून २१ सप्टेंबरपर्यंत एकूण १८ हजार ४२४ वाहनचालकांवर हेल्मेट न वापरल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे.

रस्ते अपघातांमध्ये दुचाकीस्वारांच्या डोक्याला होणारी गंभीर दुखापत व त्यातून होणारी जीवितहानी टाळण्यासाठी हेल्मेटचा नियमित वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे केवळ दंडात्मक कारवाई न करता नागरिकांमध्ये 'हेल्मेट म्हणजे दंडापासून बचाव नव्हे, तर जीवाच्या सुरक्षेचे साधन' ही भावना निर्माण करण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी हेल्मेट जनजागृती शिबिरे, नागरिकांशी संवाद, वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून रक्तदान शिबिरांचेही आयोजन करण्यात येत आहे. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना हेल्मेट भेट देऊन एकाच उपक्रमातून 'रक्तदानातून जीवन वाचवा आणि हेल्मेटमधून स्वतःचा जीव सुरक्षित ठेवा' असा सामाजिक संदेश देण्यात येत आहे.

नागरिकांकडे हेल्मेट उपलब्ध असल्यास त्याचा वापर करण्याची सवय अधिक दृढ होईल, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. दंडात्मक कारवाईसोबत सकारात्मक पद्धतीने जनजागृती करून वाहतूक नियमांचे पालन करण्याची संस्कृती निर्माण करण्यावर पोलिसांचा भर आहे.

हेल्मेट व सीट बेल्ट वापराबाबत लातूर पोलीस दलाकडून करण्यात येत असलेल्या अंमलबजावणीला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. अनेक वाहनचालक पोलिसांच्या कारवाईच्या भीतीपोटी नव्हे, तर स्वतःच्या व कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी स्वयंस्फूर्तीने हेल्मेट व सीट बेल्टचा वापर करताना दिसून येत आहेत.

# विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

**लातूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अ' विभागीय वेटलिफ्टिंग (मुले) स्पर्धा दयानंद वेटलिफ्टिंग हॉल, लातूर येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालय, लातूरने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड उपस्थित होते तर कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी महाविद्यालयाच्या क्रीडा डॉ. वैशाली माढेकर, डॉ. नितेश स्वामी, डॉ. महेश बेंबडे, डॉ. अशोक वाघमारे, 'अ' विभाग सचिव डॉ. प्रशांत चव्हाण, प्रा. ऋषिकेश मस्के, प्रा. देवडे बाळकृष्ण, डॉ. अनिल इंगोले आदी उपस्थित होते.




विविध वजनी गटांत झालेल्या स्पर्धेत खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. उपलब्ध निकालानुसार ६० किलो वजनी गटात भालेराव भूपकर यांनी प्रथम, जाधव सुशांत यांनी द्वितीय तर भुरुड हनुमान यांनी तृतीय क्रमांक मिळविला. ६५ किलो गटात पतंगे समाधान प्रथम, इंगोले मयूर द्वितीय तर मायूर गौरव तृतीय ठरले. ७० किलो गटात शिंदे संतोष यांनी प्रथम तर गव्हाणे स्वप्नील यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

७५ किलो गटात शेंडगे श्रीनिवास, ८५ किलो गटात वाघमारे चैतन्य यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ९५ किलो गटात शेंडोरे श्रीनिवास प्रथम, भुई स्वप्नील द्वितीय तर साबळे रोहन तृतीय ठरले. ११० किलो गटात उण्हाळे समर्थ प्रथम, शेख नावेद द्वितीय तर तापसे अरविंद तृतीय आले. तर ११० किलोपेक्षा अधिक वजनी गटात सुर्वसे कृष्णकांत प्रथम, जाधव अविनाश द्वितीय तर शेख अब्दुल मकीम तृतीय ठरले. विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे पंच म्हणून ज्ञानेश्वर माळी, नितीन कांबळे, अर्जुन पतंगे, भोसले ऋषिकेश, सचिन झेटे, सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन केले. तसेच सर्वसाधारण विजेतेपद पटकावल्याबद्दल दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या खेळाडूंचे आणि क्रीडा विभागाचे कौतुक करण्यात आले.

# दोन लाखांची रोकड बारमधून केली लंपास

**चाकूर :** लातूर-नांदेड महामार्गावर असलेल्या एका राजबारला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य करत बारची भिंत फोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी बारमधील तब्बल दोन लाख रुपयांची रोख रक्कम तसेच मोठ्या प्रमाणात सिगारेटचा साठा लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे महामार्गालगतच्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लातूर-नांदेड महामार्गावर राजबार व्यवसाय सुरू आहे. नेहमीप्रमाणे बार बंद झाल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी संधी साधत बारच्या पाठीमागून असलेल्या भिंतीला भगदाड पाडले. या मार्गाने बारमध्ये प्रवेश करून चोरट्यांनी आतील रोख रकमेसह साहीत्याची चोरी केली. बारमध्ये असलेले सुमारे दोन लाख रुपयांची रोख रक्कम आणि सिगारेटचा साठा चोरून नेला. सकाळी बार उघडण्यासाठी आलेल्या संबंधितांच्या निदर्शनास भिंत फोडल्याचे आल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती संबंधित पोलिसांना देण्यात आली.

चोरटे एवढे चालाख होते की त्यांनी सीसीटीव्हीचा डीव्हीआर सोबत घेऊन गेला व ज्या ज्या ठिकाणी हात लावण्याचा प्रसंग आला त्या त्या ठिकाणी फिनेल टाकण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी बार मालक गणेश नरवटे यांनी सांगितले. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली.

लातूर-नांदेड हा वर्दळीचा महामार्ग असून या मार्गालगत अनेक व्यावसायिक आहेत. अशा ठिकाणी चोरीची घटना घडल्याने व्यापारी व व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी महामार्गालगतच्या व्यावसायिक ठिकाणांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या गुणवंतांचा गौरव

## जी.पॅट सह विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी; गुणवंतांना ८१ हजारांचे प्रोत्साहनपर बक्षीस

**लातूर :** फार्मसी शिक्षणाच्या क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत 'लातूर पॅटर्न'ची ओळख निर्माण करणाऱ्या दयानंद शिक्षण संस्था,लातूर संचलित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला.

जी.पॅट परीक्षा,विविध स्पर्धा तसेच राज्यस्तरीय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व रोख बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांतजी उटगे, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ.प्रशांत मन्नीकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते तसेच जी.पॅट विभागप्रमुख डॉ.अर्चना येलमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. फार्मसी क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची माईल स्टोन मानली जाणारी जी.पॅट परीक्षा उत्तीर्ण करून एम.फार्म मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकारच्या ए.आय. सी.टी.इ. पोस्ट ग्रॅजुएट स्कॉलरशिप योजनेअंतर्गत




वार्षिक १,४८,८०० इतकी शिष्यवृत्ती मिळते. दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीने जी.पॅट निकालातही उल्लेखनीय कामगिरी केली. केंद्रे ओंकार याने देशपातळीवर ३५६ वा ऑल इंडिया रँक मिळविला.

देशपातळीवर ५०० च्या आतील रँक मिळविल्या बद्दल त्याचा १०,००० रोख बक्षीस देऊन विशेष गौरव करण्यात आला. तसेच जी.पॅट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पवार प्रतीक, दिवाण श्रेया, शेख सलमान, जाधव प्रणिता, सुरवसे श्वेता, बिराजदार शीतल, मुंढे परमेश्वर, हाके सरिता, कोटलवार दर्शन, क्षीरसागर विशाल, बियाणी श्रद्धा, मसूलदार नुजत, हत्ते महेश, नाईक श्रेया, पवार गोपिका, नरवडे वैष्णवी, पवार अश्विनी, वाकळे श्वेता, इंगोले योगेश, खारकाडे श्वेता व सकाळे आकाश या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३,००० चे प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

माजलगाव येथील गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे आयोजित राज्यस्तरीय पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत डी.फार्म गटातून शेख सानिया व शेख तस्मिया यांनी तब्बल ९४ संघांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला आणि माउली कॉलेज ऑफ फार्मसी, उदगीर येथे आयोजित रिजनल लेव्हल पोस्टर प्रेझेंटेशन कॉम्पिटिशनमध्ये डी.फार्म द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. वैष्णवी मुदकण्णा व कु. अपेक्षा वाघमारे यांनी कॉन्सोलेशन पारितोषिक मिळविले.

याबद्दल त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल चारीही विद्यार्थिनींना प्रत्येकी २,००० चे प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमण, अनधिकृत बांधकामाच्या आरोपांवरून
# नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांना जिल्हाधिकाऱ्यांची नोटीस

## अपात्रतेच्या अर्जावर सात दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश; पुढील कार्यवाहीकडे रेणापूरचे लक्ष

**लातूर :** रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्या नगरसेवक पदाच्या अपात्रतेसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महत्त्वपूर्ण कार्यवाही सुरू झाली आहे. शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमण व अनधिकृत बांधकामासंदर्भात प्रदीप माने यांच्या वतीने महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे अर्ज दाखल करण्यात आला आहे.

या अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांना नोटीस बजावली असून, अर्जातील आरोपांबाबत सात दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**नगराध्यक्षपदावर राहणार की जाणार?**

■ शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाच्या आरोपांवरून नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्या अपात्रतेसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे कार्यवाही सुरू झाली आहे. नोटीस बजावून सात दिवसांत खुलासा मागविण्यात आल्याने रेणापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मात्र, आरोपांची सत्यता आणि त्याचा नगराध्यक्षपदावर होणारा परिणाम पुढील कायदेशीर प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

तक्रारदाराच्या वतीने ॲड. सुरज साळुंके यांनी संबंधित कागदपत्रे व कायदेशीर बाबी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सादर केल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील कलम ४४(१)(ई) अंतर्गत अनधिकृत बांधकामासंदर्भात नगरसेवकाच्या अपात्रतेची तरतूद असल्याचा आधार अर्जात घेण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्या नोटीसीनंतर आता नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्याकडून कोणता खुलासा सादर केला जातो आणि त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणती कायदेशीर कार्यवाही केली जाते, याकडे रेणापूर शहराचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील आरोप अद्याप सिद्ध झालेले नसून, संबंधित पक्षाचा खुलासा आणि उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय होणार आहे. त्यामुळे या कार्यवाहीचा नगराध्यक्षपदावर नेमका काय परिणाम होतो, हे जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढील निर्णयानंतरच स्पष्ट होणार आहे.

# सांगवीमधील ३५ वर्षांपासूनचे गावठाण अतिक्रमण अखेर मोकळे

**रेणापूर :** सांगवी (ता. रेणापूर) येथील जुन्या गावठाणाच्या सुमारे ६ एकर २० गुंठे शासकीय जमिनीवरील गेल्या ३० ते ३५ वर्षांपासूनचे अतिक्रमण अखेर मोकळे करण्यात आले. गावचे उपसरपंच डॉ. परमेश्वर जाधव यांच्या पुढाकारातून या जागेची शासकीय मोजणी करून हद्दी व खुणा कायम करण्यात आल्या.



ही कार्यवाही उपविभागीय अधिकारी औसा-रेणापूर अविनाश कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. महसूल विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून गावठाणाच्या हद्दी निश्चित केल्या.

यावेळी पोहरेगाव विभागाच्या मंडळ अधिकारी सानिया सौदागर, ग्राम महसूल

**६ एकर २० गुंठे जागेची शासकीय मोजणी; हद्दी व खुणा कायम, ग्रामस्थांत समाधान**

अधिकारी बालाजी साळी आणि मोजणी पथकातील सोनवणे यांनी मोजणीची कार्यवाही केली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. पोलीस विभागाच्या वतीने गिरी साहेब उपस्थित होते.

गावठाणाची जागा ग्रामस्थांच्या उपयोगासाठी

अनेक वर्षांपासून अतिक्रमणाच्या विळख्यात असलेली मोठी जागा शासकीय मोजणीनंतर ग्रामस्थांच्या उपलब्धतेत आली आहे. त्यामुळे गावाच्या भविष्यातील विकासासाठी या जागेचा उपयोग करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गावठाणाची जागा ग्रामस्थांच्या हितासाठी विविध सार्वजनिक कामांसाठी उपयोगात आणली जाईल, अशी माहिती सरपंचांनी दिली.

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या कार्यवाहीमुळे सांगवी ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, महसूल प्रशासनाच्या कारवाईचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# गरसुळीत जि.प. सदस्य आशाताई भिसेंसह काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

**रेणापूर :** रेणापूर तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची झळ आता थेट शेतकऱ्यांच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. पिके संकटात सापडली असून पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धिरज देशमुख यांच्या सूचनेनुसार गरसुळी येथे दुष्काळ परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

जि.प. सदस्य आशाताई भिसे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत



पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली.

शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता यासह विविध समस्या उपस्थित केल्या. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून हातातोंडाशी आलेला घास संकटात सापडल्याची व्यथा शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, पीकविमा व शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात लातूर ग्रामीण जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष गंगासिंह कदम, रेणापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोद कापसे, जिल्हा संघटक अनिल पवार, पं.स. सदस्य बालाजी गोटके, उद्धव जाधव, रेणा साखर कारखाना संचालक बालाजी हाके पाटील, बाजार समिती संचालक अमर वाकडे, किसान काँग्रेस अध्यक्ष दीपक जगदाळे, बिभीषण कदम, केशव माने, युवक काँग्रेस अध्यक्ष विश्वजित पाटील, माधव सोनवणे, संतोष शिंदे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गरसुळी येथील शेतकरी अनंत बापू कातळे, सुधाकर चव्हाण, भागवत सरवदे, हरी देशमुख, नरशिंग देशमुख, भागवत कातळे, उत्तम कातळे, श्रीहरी बुकतर, व्यंकट देशमुख, भास्कर चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व ग्रामस्थांनी उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्या.

# गणेश विसर्जनासाठी मनपाची सज्ज!

**लातूर :** शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश विसर्जनासाठी लातूर महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी विसर्जनाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. मनपाचे सर्व क्षेत्रीय अधिकारी, अतिक्रमण विभाग प्रमुख, स्वच्छता अधिकारी व कर्मचारी, उद्यान विभाग प्रमुख तसेच अग्निशमन अधिकारी यांची आयुक्तांनी बैठक घेतली.

यावेळी गणेश विसर्जनासाठी आवश्यक मनुष्यबळ, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, वीज व्यवस्था, प्रत्येक मूर्ती संकलन केंद्रावर मंडप व्यवस्था, मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्या काढणे आणि रस्त्यांची स्वच्छता याबाबत विविध सूचना देण्यात आल्या. दि. २५ सप्टेंबरपूर्वी सर्व संबंधित कामे पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी विभागप्रमुखांना दिले. दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरात १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. नागरिकांनी गणेशमूर्ती या संकलन केंद्रांवरच द्याव्यात, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. या बैठकीस उपायुक्त वसुधा फड, पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री, अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, विभाग प्रमुख समाधान सूर्यवंशी, जे. एम. ताकपिरे यांच्यासह स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर

## भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नांना यश

**लातूर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्वात मोठ्या असलेल्या मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याचा राज्यातील महायुती शासनाने निर्णय घेतला असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नाला अखेर यश आले आहे. मुरुड तालुका निर्मितीची ही पहिली पायरी आहे.

लातूर तालुक्यात मुरुड हे सर्वात मोठे शहर असून मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळावा अशी अनेक वर्षापासून मुरुड आणि परिसरातील नागरिकांची मागणी होती. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी विधानसभा निवडणुकीत मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळवून देऊ असे आश्र्वासन दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे आ. कराड यांनी मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले.



आ. कराड यांच्या प्रयत्नाला यश आले असून राज्याच्या महसूल विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याचा अध्यादेश २२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णया परिपत्रकानुसार घेण्यात आला आहे. लातूर तहसील कार्यालयाचे दोन भागात विभागणी करण्यात आली असून त्यानुसार नव्याने कार्यान्वित होत असलेल्या मुरुड अप्पर तहसील अंतर्गत मुरुड, चिंचोली ब. आणि तांदूळजा या महसूल मंडळाचा समावेश करण्यात आला आहे तर लातूर तहसील कार्यालय अंतर्गत उर्वरित लातूर, कन्हेरी, हरंगुळ बु., गातेगाव, बाभळगाव आणि कासारखेडा ही महसूल मंडळे ठेवण्यात आली आहेत.

मुरुड शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत आणि लहान-मोठ्या उद्योजकासाठी आणि सुशिक्षित बेरोजगाराकरिता मुरुड येथे एमआयडीसी कार्यान्वित व्हावी, नवीन सुसज्ज विश्रामगृह यासाठी राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून कारवाई सुरू असून लवकरच मंजुरी मिळणार असल्याची माहिती देऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित होणे ही बाब मुरुड तालुका निर्मितीची पहिली पायरी असून शासनाच्या या निर्णयामुळे मुरुड आणि त्या परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे.

मुरुडला अप्पर तहसील कार्यालय मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# लातुरात रंगणार 'जल्लोष लोककलेचा'

**लातूर :** महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरेचा वारसा जपण्यासाठी तसेच नव्या पिढीला आपल्या मातीशी आणि संस्कृतीशी जोडण्यासाठी बालरंगभूमी परिषद, लातूर

**शेकडो बाल कलावंत सादर करणार महाराष्ट्राच्या लोकपरंपरांचा रंगमंचावर जागर**

शाखेच्या वतीने 'जल्लोष लोककलेचा महोत्सव २०२६' या लोककला महोत्सवाचे आयोजन २७ व २८ सप्टेंबर २०२६ रोजी दगडोजीराव देशमुख सभागृह, लातूर येथे करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आजही जीवंत असलेल्या विविध लोककलांना भव्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. पोवाडा, भारूड, लावणी, गोंधळ, लोकगीते, लोकनृत्य, आदिवासी कला, धनगरी गजा, शेतकरी यांसह विविध पारंपरिक लोकवाद्याचे व लोककलांचे सादरीकरण महोत्सवात पाहायला मिळणार आहे. विविध शाळेतील बाल कलावंत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीतून रसिकांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणार आहेत. यात २७ सप्टेंबर रोजी समूह नृत्य, एकल नृत्य सादर होईल तर २८




सप्टेंबर रोजी समूह गायन, एकल गायन व एकल वाद्य होईल.

'जल्लोष लोककलेचा' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा उत्सव ठरणार आहे. लातूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालकलावंतांना प्रोत्साहन द्यावे आणि या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद, लातूर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

# औसा न.प.च्या सफाई कामगारांना सेवेत घेण्याबाबत आदेश

## किमान वेतन, वैधानिक लाभांसह प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश

**औसा :** औसा नगरपरिषदेत बाह्यस्रोत यंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या सफाई व घनकचरा व्यवस्थापन कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यानंतर मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक मुंबई येथे झाली. बैठकीत कामगारांना वेतन व वैधानिक लाभ मिळत नसणे, सेवेतून कमी करण्यात आल्याचा प्रश्न तसेच अन्य प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत औसा नगरपरिषदेत घंटागाडीवर काम करणाऱ्या तसेच सफाईच्या कामावर असलेल्या ७१ कामगारांना सेवेत घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश कामगार मंत्र्यांनी दिले. तसेच कामगारांना नियमानुसार किमान वेतन देण्यात यावे, आवश्यकतेनुसार नवीन निविदा काढण्याची कार्यवाही करावी



आणि कामगारांच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कार्यवाही करावी, असेही आदेश देण्यात आले. कामगारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने कामगार विभागाने तातडीने तपासणी (इन्स्पेक्शन) करून संबंधित नियमांनुसार कार्यवाही करावी, असे निर्देशही मंत्री फुंडकर यांनी दिले. त्यामुळे औसा नगरपरिषदेत बाह्यस्रोत पद्धतीने काम करणाऱ्या सफाई व घनकचरा व्यवस्थापन कामगारांच्या प्रश्नांना आता गती मिळण्याची अपेक्षा आहे. आ. अभिमन्यू पवार यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला असून, या बैठकीत कामगारांच्या विविध मागण्या आणि समस्यांवर सकारात्मक चर्चा

**कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न**

होऊन तातडीने कार्यवाहीचे निर्देश मिळाल्याची माहिती देण्यात आली. बैठकीस कामगार विकास विभागाचे अधिकारी अभिजीत तेलवेलकर, उपायुक्त नितीन पाटणकर, औसा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, व्ही. डी. कदम, सहाय्यक कामगार आयुक्त एम. ए. सय्यद, सहाय्यक कामगार आयुक्त शीतल बांदल, सहाय्यक कामगार आयुक्त अश्रिवनी साकोरे, कामगार संघटनेचे राजकुमार होळीकर, अजय कांबळे, महेंद्र कांबळे, नेताजी बनसोडे आदी उपस्थित होते.

# महापालिकेकडून अनधिकृत नळ जोडण्या खंडीत

**लातूर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने आज मोठी कारवाई करत हरंगुळ ते धनेगाव रस्त्यावरील मुख्य जलवाहिनीच्या 'एअर व्हॉल्व्ह'वरील तब्बल ९५ अनधिकृत नळ जोडण्या खंडीत केल्या आहेत.

शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र, मुख्य जलवाहिनीवरील एअर व्हॉल्व्हवर अनधिकृतपणे कनेक्शन्स घेतल्यामुळे पाणी पुरवठ्यावर आणि दाबावर विपरीत परिणाम होत आहे. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाडयांनी या बेकायदेशीर जोडण्या तात्काळ काढण्याचे आदेश दिले होते. या आदेशाची अंमलबजावणी करत आज, मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत हरंगुळ ते धनेगाव मार्गावर विशेष मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईचे गांभीर्य लक्षात घेत महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी स्वतः या मोहिमेत सहभागी झाले होते. स्वतःआयुक्त राहुल कुलकर्णी,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, कार्यकारी अभियंता गणेश देवणीकर, पाणीपुरवठा अभियंता क्षितीज कटके,प्रवीण चव्हाण, जलील शेख तसेच धाराशिव जिल्ह्यातील महसुल व पोलीस यंत्रणा यांचे कर्मचारी या कारवाई दरम्यान प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोणताही अनुचित प्रकार न घडता अत्यंत वेगाने हे सर्व ९५ अनधिकृत कनेक्शन्स कायमचे काढण्यात आले.

सार्वजनिक जलवाहिनीचे नुकसान करून किंवा एअर व्हॉल्व्हमध्ये फेरफार करून अनधिकृतपणे पाणी घेणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा या मोहिमेच्या माध्यमातून महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.



# राज्यात दुष्काळ लवकरच जाहीर होणार

**मुंबई :** राज्यात एल-निनोचा फटका जाणवू लागला आहे. आता मराठवाड्यात सप्टेंबर महिन्यातच टँकर सुरु झाले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी सोयाबिनची पिके करपली आहेत. त्यामुळे राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधक करत होते. आता या पार्श्वभूमीवर मोठी बातमी समोर आली आहे. राज्यात येत्या दोन ते तीन दिवसात दुष्काळ जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाच्या ज्येष्ठ नेत्याने दिली आहे.

राज्यात अवर्षणाचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या तोंडचे पाणी पळाले आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारने मदत जाहीर करणार असल्याचे म्हटले आहे. मात्र, राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जेष्ठ नेते शरद पवार यांनी केली होती. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांची मागणी रास्त असल्याचे म्हटले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यातील लातूर, धाराशीव जिल्ह्याचा दौरा केला आहे. त्यांनी पावसाअभावी करपलेल्या पिकांची पाहणी केली आहे. तसेच शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकट मदत देण्याचे आश्वासन दिले. कोणत्याही प्रकारचे आढेवेढे घेतले जाणार नाही, शेतकऱ्यांना सरकट मदत दिली जाईल, असा शब्दच मुख्यमंत्र्यांनी दिला होता.

**भाजपा ज्येष्ठ नेते राम शिंदे यांची माहिती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार या संदर्भात लवकरच निर्णय घेणार आहेत. दुष्काळी परिस्थितीची पाहणी करुन आता येत्या शनिवारपर्यंत दुष्काळ जाहीर होईल असे भाजपाचे ज्येष्ठ नेते राम शिंदे यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांना मदत करताना त्यांना काही अडचणी असेल तरी देखील त्यावर चर्चा करणार असल्याचे राम शिंदे यांनी म्हटले आहे. राज्यात दुष्काळ परिस्थितीवर कर्नाटक राज्याप्रमाणे अधिवेशन बोलवणार का? या प्रश्नावर राम शिंदे म्हणाले की अधिवेशन घेण्यापेक्षा फिल्डवर जाऊन लोकांना मदत केली पाहिजे असे राम शिंदे यांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री शेताच्या बांधावर

**धाराशिव :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर तालुक्यातील करजखेडा येथे थेट शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. कोरडा पडलेला साठवण तलाव आणि नुकसानग्रस्त ऊस व सोयाबीन पिकांची पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्याची ग्वाही दिली. दुष्काळाची परिस्थिती गंभीर असली तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, दुष्काळाचा सामना करण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुढील चार-पाच महिने आव्हानात्मक असून, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पीक कर्जमाफी, पीक कापणी प्रयोग, पीक विमा, थेट आर्थिक मदत, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि अन्नधान्याची उपलब्धता याबाबत शासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. शेतकरी कुटुंबातील मुलांचे शिक्षण बंद पडू दिले जाणार नाही, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार बसवराज पाटील, राणाजगजितसिंह पाटील व अभिमन्यू पवार यांच्यासह अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# विलास साखर कारखान्याला राष्ट्रीय सन्मान

**लातूर :** विलास सहकारी साखर कारखान्याला राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली यांच्या वतीने गळीत हंगाम २०२५-२६ साठी 'उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. २२ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार स्वीकारण्यात आला.

कारखान्याच्या वतीने माजी आमदार व व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, संचालक सतीश शिंदे (पाटील) व अमृत जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला. कारखान्याच्या तांत्रिक कामगिरीची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे. गत हंगामात कारखान्याने ६,५१,४३१ मे.टन उसाचे गाळप करत सरासरी १२.२१ टक्के साखर उतारा मिळवला. यामधून ७,१४,४७० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले. तसेच वीज निर्मिती आणि इथेनॉल उत्पादनातही कारखान्याने उल्लेखनीय कामगिरी केली. या पुरस्कारासह कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या यशाबद्दल शेतकरी, सभासद, अधिकारी, कर्मचारी व लातूरकरांकडून अभिनंदन होत आहे.

**लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा! तांत्रिक कार्यक्षमतेचा डंका**



# पदवीधर निवडणुकीसाठी आचारसंहिता झाली लागू

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासह राज्यातील पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला असून, औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने संबंधित आठ जिल्ह्यांमध्ये तत्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, निवडणूक प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पार पाडण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिली.

निवडणूक कार्यक्रमानुसार २२ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध, ६ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख, ७ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी आणि ९ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. मतदानानंतर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे.

**२३ सप्टेंबर रोजी राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय पदाधिकाऱ्यांची बैठक**

निवडणूक कार्यक्रम आणि आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय अध्यक्ष व सचिवांची बैठक २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस संबंधित राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय अध्यक्ष व सचिवांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बैठकीच्या अनुषंगाने औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाचे जिल्हानिहाय निवडणूक कामकाज, आदर्श आचारसंहितेचे पालन तसेच निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील आवश्यक बाबींवर चर्चा होणार आहे.

# भोकरंबा येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**भोकरंबा :** दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणाच्या संकटाला कंटाळून भोकरंबा (ता. रेणापूर) येथील शेतकरी



मोहन निवृत्ती गोरे (वय ५३) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गोरे यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घटनेने ग्रामीण भागातील परिस्थिती पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करा; जि.प. शाळांत वॉटर फिल्टर बसवा

**रेणापूर :** दुष्काळाच्या संकटामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक भार वाढला आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे, तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आधुनिक वॉटर फिल्टर बसविण्यात यावेत, अशी मागणी राष्ट्रीय गोर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार सतीश चव्हाण यांच्याकडे केली.

यासंदर्भातील मागणीचे निवेदन दि. २२ रोजी शासकीय विश्रामगृह येथे आमदार सतीश चव्हाण यांना देण्यात आले. दुष्काळामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अडचणीत आली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार ठरत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

**राष्ट्रीय गोर सेनेची आ. सतीश चव्हाण यांच्याकडे मागणी**

दरम्यान, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळांमध्ये सुरक्षित, स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र काही शाळांमध्ये उपलब्ध



पाण्याच्या गुणवत्तेबाबत पालकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत आधुनिक वॉटर फिल्टर बसविण्यासाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राष्ट्रीय गोर सेनेच्या वतीने करण्यात आली. या दोन्ही मागण्यांची दखल घेऊन संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याची अपेक्षाही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी राष्ट्रीय गोर सेनेचे धोंडीराम चव्हाण, कैलास चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदित्य मोटेगावकरवर दोन वर्षांची बंदी; 'नीट' प्रकरणात कुटुंबाला धक्का



**लातूर :** देशभरात गाजलेल्या NEET पेपरफुटी प्रकरणाचे धागेधोरे आता लातूरमधील प्रसिद्ध कोचिंग क्लासेस चालकांपर्यंत पोहोचले असून, या प्रकरणात मोटेगावकर कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. NEET-UG २०२६ परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने कठोर पाऊल उचलत आदित्य शिवराज मोटेगावकर याच्यावर दोन वर्षांची बंदी घातली आहे. या कारवाईमुळे शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'नीट'च्या परीक्षेदरम्यान झालेल्या कथित गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर एनटीएने आदित्य शिवराज मोटेगावकर याची २०२६ ची उमेदवारी तात्काळ रद्द केली आहे. एवढेच नाही तर, त्याला आगामी NEET-UG २०२७ च्या परीक्षेला बसण्यासही मनाई करण्यात आली आहे. म्हणजेच एनटीएकडून त्याच्यावर थेट दोन वर्षांसाठी 'नीट' परीक्षेबाबत बंदी लादण्यात आली आहे. परीक्षेतील पारदर्शकता आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

दुसरीकडे, या संपूर्ण प्रकरणात लातूरमधील नामांकित 'आरसीसी कोचिंग क्लासेस'चे संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने या प्रकरणी शिवराज मोटेगावकर यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे. तपासादरम्यान सीबीआयने जप्त केलेल्या शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमधून अत्यंत संवेदनशील आणि धक्कादायक माहिती समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. मोटेगावकर यांच्या मोबाईलमध्ये मिळालेल्या संशयित प्रश्नांचा थेट एनटीएच्या मूळ मास्टर प्रश्नसंचाशी थेट संबंध असल्याचे सीबीआयने न्यायालयात सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

# रेणापूर तालुक्यातील ४८ हजार हेक्टरील पिके पावसाअभावी वाळली!

## यंदा पावसाअभावी खरीप गेले; शासनाच्या मदतीकडे लक्ष। पशुधनाच्या चारा-पाण्याची चिंता वाढली

**रेणापूर :** रेणापूर तालुक्यात पावसा अभावी सोयाबिन पिका सह इतर पिकांनी माना टाकल्या असून ४८ हजार हेक्टरवरील पिके वाळली असून शेतकऱ्यांनी कर्ज काढून केलेला खर्च ही वाया गेल्याने शेतकरी व मजूर आर्थिक संकटात सापल्याने कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जात आहे.

गतवर्षी अतीवृष्टीने वाहून गेली यंदा चांगला पाऊस पडेल अशी अपेक्षा आसणाऱ्या रेणापूर तालूक्यातील शेतकऱ्यांचा वरुन राजाने पाठ फिरवल्याने अपेक्षा भंग झाला आहे . पावसाळ्याच्या सुरुवाती पासून मोठा आणि अपेक्षीत असा नदी नाले खळखळून वाहणारा पाऊसच पडला नाही सुरुवातीच्या रिमझीम पावसावरच शेतकऱ्यांनी कशाबशा पेरण्या केल्या परंतू मोठा आणि अपेक्षीत पाऊसच झाला नाही. यामुळे मुग उडीद सोयाबीन यांनी पावसा अभावी माना टाकल्या सोयाबिन,मुगाचे पिक वाळून गेले. तुरीची वाढ खुंटली,एकूणच रेणापूर तालूक्यातील ४८ हजार हेक्टरवरील पिके वाळली, सोयाबिन पिकाची वाढ होतांना फुले येताना आणि शेंगा लागताना पावसाळ्याच्या सुरुवाती पासून पावसाळा संपत आला तरी अपेक्षीत असा पाऊस पडला नाही. शेतकऱ्यांनी आता बियाणाला आणि मशागतीला घातलेले पैसे सुधा निघत नाहीत. सोयाबीन आले नसल्याने मजूराच्या हाताला काम मिळत नाही. आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येईल अशी अवस्था रेणापूर तालूक्यात झाली आहे. तर खरीप पिके वाळत असल्यामुळे पशुधनाच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

गतवर्षी अतिवृष्टीमुळे हाता तोंडाशी आलेले खरीपाचे पिक वाहून गेले होते व ओला दुष्काळ जाहीर होवुनही सरसगट पिक विमा मिळाला नाही तर यावर्षी पावसाळा सुरु होवून चार महीने संपत आले तरीही मोठा पाऊस पडला नसल्याने नदी नाले कोरडे आहेत अल्पशा पडलेल्या पावसावर कसेबसे पेरलेले सोयाबिन करपून गेले आहे. सद्यस्थितीत पिकांची पाहणी करताना शेतकऱ्यांच्या डोळ्यातील आलेले पाणी कोण पुसणार अशी अवस्था निर्माण झाली आहे. पावसाने पाठ फिरवल्यामुळे जमीनीतील भुजल पातळी दिवसेन दिवस खालावत चालली आहे.नदी- नाले, विहीरी - बोअरवेल कोरड्या पडत आहेत.जनावरांच्या चाऱ्यां पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे.



रेणापूर तालुक्यात पानगाव, रेणापूर, पळशी, कारेपूर, पोहरेगाव हे पाच महसुल मंडळ असून गत वर्षी पाचही महसुल मंडळात अतिवृष्टी झाली होती काढून ठेवलेले सोयाबीनचे ढीग शेतातील माती सह वाहून गेले. शासनाने ओला दूष्काळ जाहीर केला पण मदत कोणालाच दिली नाही तर विमा फक्त पानगाव महसूल मंडळात मिळाला तोही तोकडाच तर या वर्षी पावसाने पाठ फिरवल्याने मोजक्याच पडलेल्या पावसाने पेरणी केलेले खरीपाचे पिके करपली आहेत.

तालूक्यातील दुष्काळी परिस्थिती, वाढलेला उत्पादन खर्च, कमी झालेला बाजारभाव यापेक्षा सर्वात मोठा प्रश्न आहे जनावरांच्या चाऱ्याचा ही मुकी जनावरे जगवायची कशी? या सोबत पेरणी साठी काढलेले कर्ज वाढत आहे यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

**शासनाच्या मदतीकडे लक्ष**

■ गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि यंदा पावसाअभावी खरीप हंगामाचे नुकसान झाल्याने रेणापूर तालुक्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शेतातील पिके डोळ्यांसमोर वाया गेल्यानंतर आता शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या मदतीकडे लागले आहे. नुकसानग्रस्त क्षेत्राचे वस्तुनिष्ठ पंचनामे होऊन प्रत्यक्ष नुकसानीच्या प्रमाणात तातडीने मदत मिळणार का, याकडे तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

तालूक्यातील सद्याची पिक स्थीती पाहता शेतकर्याला धिर द्यावा अशी चर्चा सर्वसामान्य शेतकरी करीत आहेत. कर्ज, उत्पादन खर्च, बाजारभाव आणि चाऱ्याची समस्या ही सर्वच शेतकऱ्यांसमोरच आव्हाने आहेत. त्यामुळे या प्रश्नांवर राजकारणापलीकडे जाऊन एकत्रितपणे आवाज उठवण्याची गरज आहे.

प्रशासनाकडून वस्तुस्थितीचा अहवाल मागवून तो शासनाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींच्या काळात पद, अधिकार आणि शासनापर्यंत असलेल्या संपर्काचा उपयोग त्यांच्या मदतीसाठी किती होतो, हा प्रश्न आता शेतकऱ्याकडून विचारला जात आहे. शेतकरी वाट पाहतोय ती शासन कधी दुष्काळ जाहीर करतोय शासकीय मदत कधी मिळतेय.

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात सोयाबीनचे पीक हाती येण्याच्या अवस्थेत असताना अतिवृष्टी झाली आणि अनेक भागांतील पिकांचे मोठे नुकसान झाले. यंदा मात्र परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. पावसा अभावी शेतातील उभी पिके करपून गेली आहेत. त्यामुळे सलग दोन वर्षे खरीप हंगामाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका दिला आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर पेरणीचा खर्च, कर्जाचे हप्ते आणि पुढील हंगामाची तयारी अशा अनेक जबाबदाऱ्या आहेत. नुकसान केवळ हंगामा पुरते नसून त्याचा त्यामुळे परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनावर होणार असल्याची परीस्थीती निर्माण झाली आहे.

हे पत्रक मुद्रक नरसिंह पांडुरंग घोणे यांनी मालक, प्रकाशक, संपादक नामदेव उत्तम शिंदे यांच्याकरिता मॅजिक पब्लिकेशन, मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स नं. १०, गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर- ४१३५१२ येथे छापून गल्ली नं. ०१, मु.पो. दर्जी बोरगाव, ता. रेणापूर, जि. लातूर - ४१३५२७ येथे प्रकाशित केले. - संपादक : नामदेव उत्तम शिंदे RNI. No. MHMAR/25/A2752